सकाळ

# 'रवळनाथ हौसिंग'चे कार्य उल्लेखनीय

## अशोक येजरे; प्रा. डॉ. कॅप्टन आवटे यांचा कुडाळात सत्कार

**कुडाळ, ता. १४ :** जिल्ह्यात सामाजिक बांधिलकी जोपासून नावलौकिक प्राप्त केलेल्या श्री रवळनाथ हौसिंग फायनान्सचे कार्य उल्लेखनीय आहे, असे प्रतिपादन बॅ. नाथ पै विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक अशोक येजरे यांनी काल (ता १३) सायंकाळी येथे केले. या वेळी एनसीसी ऑफिसर पुरस्कारप्राप्त प्रा. डॉ. कॅप्टन आवटे यांचा सत्कार झाला.



कुडाळ : 'रवळनाथ हौसिंग'चे संचालक प्रा. डॉ. कॅप्टन आवटे यांचा सत्कार करताना अशोक येजरे, एम. एल. चौगुले, सागर तेली, श्री. चव्हाण, सौ. शिरसाट, सौ. मदने, श्री. देऊलकर आदी.

येथील संत राऊळ महाराज महाविद्यालयात कार्यरत एन.सी.सी. विभाग प्रमुख, हिंदी विभाग प्रमुख व श्री रवळनाथचे संचालक प्रा. डॉ. कॅप्टन एस. टी. आवटे यांना कोल्हापूर एनसीसी ग्रुपतर्फे बेस्ट एनसीसी ऑफिसरचा पुरस्कार मिळाल्याबद्दल संस्थेच्या कार्यालयात त्यांचा सत्कार करण्यात आला. कोरोना नियमांच्या अधीन राहून हा कार्यक्रम श्री रवळनाथ को ऑप हौसिंग फायनान्स सोसायटी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. यावेळी संचालक सीए सागर तेली, प्रा. अजय चव्हाण, सल्लागार विलास देऊलकर, रुपाली शिरसाट, सानिका मदने, शाखाधिकारी विक्रम जांभेकर, दिव्या बांदेकर, मनीष परब, साईल नानचे उपस्थित होते.

संस्थापक अध्यक्ष चौगुले म्हणाले, "मार्चमध्ये श्री रवळनाथ सोसायटीची नववी शाखा येथे दिमाखात सुरू झाली. या संस्थेचे येथील सर्व संचालक हे रवळनाथचे भूषण आहे. विशेष म्हणजे डॉ कॅप्टन आवटे यांना जो पुरस्कार मिळाला तो रवळनाथची शान वाढविणारा आहे. संस्थेचा डोलारा हा संचालक मंडळावरच उभा असतो. डॉ. आवटे म्हणाले, "श्री. चौगुले यांची जिद्द, चिकाटी मेहनत आणि दुसऱ्यांना नेहमीच मदत करण्यासाठी जी आपुलकीची भावना व सामाजिक बांधिलकी जोपासली, या त्यांच्या कार्याने प्रेरित होऊनच नावलौकिक प्राप्त झालेल्या या संस्थेचे संचालक झालो. त्यांची कार्यपद्धती ही निश्चितच सर्वांना प्रेरणा देणारी आहे." संचालक सानिका मदने यांनी सूत्रसंचालन केले. संचालक प्रा. चव्हाण यांनी आभार मानले.

### कोकणवासीयांची मने जिंकली

येजरे म्हणाले, "श्री रवळनाथ हौसिंग फायनान्सने येथील स्वतःच्या जागेत शाखेची मुहूर्तमेढ रोवून अल्पावधीतच कोकणवासीयांची मने जिंकली. संस्थापक अध्यक्ष चौगुले यांची धडपड कौतुकास्पद आहे. जानेवारीमध्ये शुभारंभ झालेल्या या संस्थेने सुरवातीपासूनच आरोग्य, शैक्षणिक इतर क्षेत्रात वाटचाल करताना मदतीचा ओघ कायम ठेवून सिंधुदुर्गाशी ऋणानुबंध जोडला आहे. सिंधुदुर्गात अल्पावधीतच नावलौकिक प्राप्त करणारी ही रवळनाथ लवकरच दैदिप्यमान यश संपादन करेल."